लोकमत

# सुरांमधून उलगडला चित्रपट संगीताचा प्रवास

**नाशिक :** संगीतकार नौशाद ते अजय-अतुल यांच्या काळापर्यंत हिंदी चित्रपटसृष्टीत बदललेले संगीत आणि या गायकांचा प्रवास गायिका डॉ.मृदुला दाढे-जोशी यांनी थेट शब्द व सुरांच्या माध्यमातून उलगडला.

बाळासाहेब वाघ स्मृतिप्रीत्यर्थ डॉ.कुर्तकोटी सभागृहात आयोजन करण्यात आले होते. 'नौशाद ते अजय-अतुल : एक संगीत प्रवास' या कार्यक्रमात पंडित शंकरराव वैरागकर अध्यक्षस्थानी होते.

गायिका लता मंगेशकर यांचे हिंदी चित्रपटसृष्टीत पार्श्वगायिका म्हणून आगमन झाल्यानंतर, या आवाजाने जादूई करिष्मा करत हिंदी गाण्याचे संदर्भच बदलले आणि त्यानंतर लतादिदींचे पर्व सुरू झाले, असे सांगून डॉ.दाढे यांनी त्यांची काही गीते सादर केली. त्या म्हणाल्या, हिंदी चित्रपट गीतांवर प्रारंभी शास्त्रीय रागदारी, लोकसंगीत अन् रवींद्र संगीताचा मोठा प्रभाव राहिला. संगीतकार नौशाद यांना लता मंगेशकर यांच्या रूपाने एक नवा काळच सापडला, हिंदी गाण्यांचे सर्वच ठोकताळे, समीकरणे लता मंगेशकरांनी मोडले, तर त्यानंतर किशोर कुमार यांच्या आवाजाने तर संगीतातील नियम बाजूला ठेवत मुक्त संगीताची उधळणच केल्याचे त्या म्हणाल्या.